# प्रकरण चौथे

# 'लक्तरांची गझल' मधील आशय आणि अभिव्यक्ती

- **प्रस्तावना**

१) हळूवार प्रेमभावनेचे सूचन करणारी कविता.

२) स्वत:चे अनुभव मांडणारी गझल.

३) जगण्यातील विषण्णता मांडणारी गझल.

४) व्यवस्थेविरोधी चीड व्यक्त करणारी गझल.

५) दलित चळवळीतील अंतर्गतता मांडणारी गझल.

६) डॉ.बाबासाहेबांच्या विषयी आदर व्यक्त करणारी गझल.

७) या संग्रहातील इतर गझला.

- निष्कर्ष
- समारोप
- संदर्भ सूची

-----

## प्रकरण चौथे

# 'लक्तरांची गझल' मधील आशय आणि अभिव्यक्ती

**प्रस्तावना :**

'लक्तरांची गझल' हा धम्मपाल रत्नाकरांचा दुसरा कवितासंग्रह. नीहारा प्रकाशन, पुणे यांनी प्रकाशित केलेला आहे.

'गझल' हा एक काव्याचा प्रकार आहे. तो मूळचा अरबी प्रकार आहे. अरबीतून उर्दूत व उर्दूतून तो मराठीत आलेला आहे. कवी माधव ज्युलियन यांनी मराठीत सर्वप्रथम गझल आणली असे म्हटले जाते. पण पहिली उपलब्ध 'गझल' उत्तर पेशवाईत होऊन गेलेल्या अमृतराय (१६९८-१७५३) ह्या कवीच्या नावावर आढळते. त्यानंतर ब्रिटिश राजवटीत १८८० ते १९२० ह्या कालखंडात उर्दू रंगभूमीवरून संगीतनाटकांद्वारे येऊन गझलेचा अधिक परिचय मराठीला झाला. नंतरच्या काळात माधव ज्युलियन व अलिकडच्या काळातील सुरेश भट हे दोन प्रमुख मराठी गझलकार होत. मराठीत गझल हा काव्यप्रकार परिचित करून देण्याचे, तो लोकप्रिय करण्याचे, रूजविण्याचे, वाढविण्याचे श्रेय याच दोघांकडे जाते. माधव ज्युलियनांनी १९२० पूर्वीच्या मराठी गझलेतील शैथिल्य दूर करून तिला शास्त्रशुद्ध स्वरूप देण्याचा प्रयत्न केला, तर सुरेश भटांनी फार्सी-उर्दू गझलेचे रचनातंत्र मूळाबर हुकूम स्वीकारून त्यामधून खरीखुरी गझल व तिही सर्वस्वी मराठीत लिहिली. तसेच ती रुजविली व लोकप्रिय केली.

कोणत्याही एका विषयाचे समग्र वर्णन हा गझलांचा विषय नसतो. वेळोवेळी सुचलेले स्फूट विचार किंवा भावतरंग हा गझलांचा विषय असतो. गझल या शब्दाचा अर्थ सांगताना श्री. रं. कुलकर्णी म्हणतात, ''प्रणयगीत किंवा प्रेयसीस उद्देशून काढलेले उद्‌गार असा या शब्दाचा वाच्यार्थ आहे.''[१]

प्रथम गझल हा प्रकार प्रणयगीतासाठीच योजला जाऊ लागला. कालांतराने इतर विषयांचीही या प्रकारात रचना होऊ लागली. विशेषत: नैतिक व धार्मिक विषयांसाठी गझलांचीच योजना भारतीय कवींनी केली. कवीला वेळोवेळी सुचणारे स्फूट, विचार अथवा लोकजिवनाच्या निरीक्षणातून स्फूरणाऱ्या कल्पना यांचा आविष्कार करण्यासाठी गझलांइतका प्रभावी व योग्य काव्यप्रकार नाही. ज्या कल्पनेची अभिव्यक्ती केवळ दोन ओळीत होऊ शकत नाही अशा कल्पना रूबया आदींच्या बंधात ग्रंथित करता येतात.

परंतु स्फूट समयस्फूर्त कल्पनातरंग यांना गझलांचेच वाहन उचित ठरते. हे श्रीधर कुलकर्णी यांचे मत आपल्याकडे जी गझल लिहिली जाते. त्या अनुषंगाने बरोबर आहे. उदा. सुरेश भटांनी लिहिलेली गझल.

वर उल्लेख केल्या प्रमाणे गझल म्हणजे मुख्यत: प्रेमभावना व्यक्त करणे होय. पण सुरेश भटांनी हा पारंपरिक अर्थ मोडून गझल समाजाभिमुख केली. याच प्रकारे आपल्याला कवी रत्नाकरांच्या गझलेकडे पाहता येईल. गझल हा एक रचनाप्रकार असला तरी त्याचे इतर तंत्र मंत्र विचारात न घेता समान अक्षर संख्या किंवा मात्रा संख्या पाडून आवर्तनी रचनेतून गझल लिहिता येते. हाच विचार समोर ठेऊन रत्नाकरानी गझल लिहिली आहे. गझलेच्या पूर्ण तंत्राप्रमाणे ही गझल नाही. मात्र हा रत्नाकरांचा प्रयत्न आहे हे ही विसरून चालणार नाही.

शेवटी काव्यप्रकार कोणताही असला तरी, त्याच्या रचनेपेक्षा आशय-विषयाला महत्त्व दिले पाहिजे. रत्नाकरांची गझल ही तंत्रानुसार यशस्वी नसली, तंत्रशुद्ध नसली तरी आशयाच्या दृष्टीने ती सधन आहे. मूळात कवी रत्नाकर हे चळवळीत वाढलेले आहेत. त्यामुळे त्यांची गझल ही मुळात फुले-आंबेडकरांच्या विचारांवर उभी आहे. कवीने आंबेडकरी चळवळीतले चढउतार विद्यार्थी दशेपासूनच पाहिलेले आहेत. ऐन तारुण्यात चळवळ पाहिली, अनुभवली त्यामुळे चळवळीची अंतर्गतता पाहून कवीचे मन विषण्ण झाले व त्यातूनच काही गझलांची निर्मिती झाली आहे. आंबेडकरी चळवळीत अंतर्गत जे नेतृत्वासाठी, सत्तेसाठी कलह चाललेले आहेत, त्याचे पडसाद या गझलेत उमटलेले आहेत.

या संग्रहात कवी रत्नाकरांनी विविध विषयांवर गझल लिहिलेली आहे. ती जशी सामाजिक विषय घेऊन येते तशी ती हळूवार प्रेमभावना सुद्धा घेऊन येते. तथागत गौतमबुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे या गझलेचे आणि कवीचे आदरस्थान राहिलेले आहे. या महामानवांच्यावरही कवी रत्नाकरांनी काही गझला लिहिलेल्या आहेत. एकूणच रत्नाकरांची 'लक्तरांची गझल' जगण्यातील वास्तवाबरोबरच जगताना निर्माण होणाऱ्या विविध समस्या, प्रश्न यावरही बोलते. समाजातील फसवेगिरी, लफंगेपणा, स्वार्थसाधूपणावृत्ती यावरही प्रकाश टाकते.

या संग्रहातील गझलांच्या अभ्यासासाठी गझलांचे वर्गीकरण केलेले आहे. ते असे -

१) हळूवार प्रेमभावनेचे सूचन करणारी गझल.

२) स्वत:चे अनुभव मांडणारी गझल.

३) जगण्यातील विषण्णता मांडणारी गझल.

४) व्यवस्थेविरोधी चीड व्यक्त करणारी गझल.

५) दलित चळवळीवर भाष्य करणारी गझल.

६) डॉ. बाबासाहेबाविषयी आदर सांगणारी गझल.

७) समाजातील ढोंगीपणावर प्रकाश टाकणारी गझल.

८) इतर विषयांवरील गझल.

गझल या वाङ्मयप्रकाराचा मूळातून अभ्यास न करता स्थूलमनाने 'लक्तरांची गझल' या संग्रहातील गझलांचा अभ्यास या प्रकरणात केलेला आहे.

## १) हळूवार प्रेमभावनेचे सूचन करणारी गझल :

मराठी कवितेच्या प्रांतात प्रेम हा एक अविभाज्य घटक आहे. अनेक कवींच्या काव्यात प्रेमाची महती गायिलेली आहे. प्रेम हा सजीवांचा स्थायीभाव आहे. तो प्रत्येकाच्या जीवनाशी निगडीत असतो. त्यामुळे कालिदासादी कवींनी ही प्रेमाची महती गायिलेली आहे. प्रेम आणि त्यातून निर्माण होणारी मानसिक अवस्था. प्रेम तुटल्यावर होणारी मनाची दोलायमान अवस्था अशा अनेकावस्थांचे चित्र मराठी कवितेमध्ये आपल्याला पहायला मिळते. वास्तविक कवीच्या संवेदनशील मनाला प्रेमासारखा हळूवार विषय जास्त भावतो. एकूण अभिजात काळापासून ते आजतागायत मराठीमध्ये विपूल प्रेमकविता लिहिली गेलेली आहे.

१९६० नंतर जो दलित कवितेचा प्रवाह आला त्यातील दलित कवींनी सामाजिक वास्तवाला आपल्या काव्यात स्थान दिले. असे असले तरी, प्रेम या गोष्टीपासूनही हे कवी अलिप्त राहू शकलेले नाहीत. कमी अधिक प्रमाणात या कवितेत ही प्रेमाचे चित्रण येते. मात्र हे प्रेम प्रस्थापित मराठी कवितेतील प्रेमाच्या जातीपेक्षा वेगळे आहे हे मान्य करावे लागते. जगताना येणाऱ्या सर्व समस्या, मानसिक ताणतणाव, सहन करावी लागणारी गुलामी, या सर्वांचेच पडसाद या कवितेत येतात. म्हणजे निखळ अर्थ वगळा (रूढ) व्यक्त होतो. प्रेमकविता येथे सापडत नाही. या कवितेला जगण्याचे 'कष्ट' आणि सोसण्याचे 'कढ' आहेत. या दलित कवितेतील प्रेम थेट वास्तवाशी भिडताना दिसते. ते जगण्याचे संदर्भ मांडते. कवी रत्नाकरांच्या 'लक्तरांची गझल'मध्ये ही अशी प्रेमकविता आहे. या गझलसंग्रहातील गझलांचा

विचार करावयाचा झाल्यास, ह्या गझलेतून येणारे प्रेम हे सफल प्रेम दिसत नाही हे मान्य करावे लागते. प्रेमात फसलेल्या एकाकी, उदास मानसिकतेच्या छटा या गझलांतून दिसतात.

''तुझ्यासाठी अनेकांना टाळावे लागले
मलाही माझ्यातून गळावे लागले
कागदी नाव माझी वादळात बुडाली
वचनांना किनाऱ्याला मिळावे लागले''[२] (चिवली)

पहिले प्रेम प्रेमिकांना खुप काही शिकवून जाते. कवी मात्र या प्रेयसीसाठी अनेकांना टाळताना दिसतो. वास्तविक कवीचा हा पहिलाच अनुभव आहे. त्यामुळे स्वत:ला विसरून गेलेला कवी कशाचाही विचार न करता फक्त तिच्या आणि तिच्याच विचारात मग्न आहे. हे पहिले प्रेम कसे होते याचा अनुभव नसणारा कवी 'जीव एकमेकांत कसा गुंततो हे मला काहीच ठाऊक नव्हते' मन मात्र कुठेतरी गुंतलेले जरूर असते.

ध्येय पाठीवर घेऊन चालणाऱ्या माणसाच्या अलवार, हळूवार मनाला जेव्हा नकाराचे तडे जातात, तेव्हा अशा धोकेबाजीचा त्याला संताप येतो. आपलीच जीवाभावाची असणारी व्यक्ती परकेपणाने वागते. तेव्हा अशी व्यक्ती पुन्हा कधीही आपल्या नजरेसमोर येऊ नये असे वाटते. मनात एकलेपणाची जाणिव निर्माण होते. कवी रत्नाकर म्हणतात,

''मी रिता किनारा उलटून जा मला
मागू नको निवारा विसरून जा मला''[३] - (किनारा)

माझ्या जवळ आता काहीच शिल्लक नाही. तेव्हा आता तू माझ्याकडे काहीच मागू नको. द्यायचे होते ते सर्व दिले. या अशा रिकाम्या अवस्थेत तूला मी काहीच देऊ शकत नाही. आता तू मला विसरून जा.

''माझ्या समीप आता राहू नको उभी
'तो' योग खोटा होता सांगून जा मला.''[४] - (किनारा)

माझी सत्यातली सारी स्वप्ने व्यर्थ ठरली, मी आता काल्पनिक स्वप्नांत बुडणार नाही, किंवा आकाश चुंबण्याच्या भानगडीत पडणार नाही. तेव्हा तूला जायचे असेल तर खुशाल जा, मी माझा रस्ता बदललेला आहे. जाताना मात्र सांगून जा की, आपण

जवळ आलो तो योगच खोटा होता. आपल्या प्रेयसीला निघून जा म्हणून सांगण्याचा निर्णय हा एका ध्येयवादी माणसांचा निर्णय आहे. तो पूर्ण विचारांती घेतलेला निर्णय आहे. आपले स्वप्न वेगळे आहे. आपल्याला या भूलभूलैयात अडकून पडता येणार नाही याची स्पष्ट कबूली कवीने दिलेली आहे.

कवी रत्नाकरांच्या कवितेत विरह भावना कधी सौम्य तर कधी गडद होताना दिसते.

''एकदा कधीतरी भेटून जा आल्यावर
भूतकाळ दोघांचा चाळून जा आल्यावर''[५] - (अपराध)

पूर्वी कधीतरी घनिष्ठ असणारे संबंध काही काळाने तुटलेले असतानादेखील कवीला वाटत असते की, गेलेल्या भूतकाळाची उजळणी पुन्हा व्हावी. कारण तू माझ्यापासून दूर गेल्याने माझी अवस्था कशी आहे हे तूला कळेल. कवी प्रेमात खूप गुंतलेला असल्याने त्याला एकाकीपण असहाय्य होते आहे. आणि मग आठवतात पहिले दिवस हळूवार, रेशमी,

''फुलांच्या गालावर मी हळूवार पाहिले
तुझे नाव प्रिये तिथे गोंदलेले पाहिले''[६] - (लाजणे)

अशा या रेशमी हळूवार आठवणी फार काळ टिकत नाहीत. कारण जगणेच इतके खडतर आणि खाचखळग्यांचे आहे. अशावेळी दोन मने फार काळ समान विचाराने राहतीलच असे नाही. मूळात कवी हा फुले-आंबेडकरी विचारधारेचा पाईक आहे. त्यामुळे त्यांचा पिंडच मुळात क्रांतीकडे ओढ घेणारा असल्याने कवी हळवेपणात फारसा कुठे गुंतताना दिसत नाही. अशावेळी मानवी सहज स्वभावानुसार भासाभास हे होतच राहतात.

''तू समोरून आल्याचा मला भास होतो
तू नसता जीव एकला उदास होतो.''[७] - (उदास)

या एकाकी जगण्यात तिचे असणे हवे होते. याची तीव्रता कवीला जाणवते. तिलाही असेच वाटत असावे अशी कल्पना कवी करतो.

''जाणतो की तू तुझ्या नसतेस जवळी
माझाही देह तसा हमखास होतो''[८] - (उदास)

कवीला खात्री आहे की, जशी माझी अवस्था झालेली आहे तशीच तिचीही झालेली आहे. म्हणून कवी म्हणतो की, आता एकही क्षण एकट्याने पूढे जात नाही.

कधी-कधी ध्येयाला कवटाळणारा कवी या हळूवार प्रेमात गुंतत जातो.तर आपण नको तिथे गुंतत चाललोय असे दिसताच तो यापासून दूर जाऊन विरहात का होईना पण पुढे जातो. कवीने म्हटले की, चंद्र चांदण्या, निसर्ग यांच्याशी त्याचे नाते जवळचे असते. आपल्या मिलनाची वेळ जवळ आली आहे असे कवीला चंद्र सांगतो आहे. हळव्या मनातील प्रियेच्या भेटीसाठी आतुरल्या मनाची असिम ओढ येथे प्रकर्षाने प्रकट झालेली आहे. ती आता येईल, आपली तहानली इच्छा पूर्ण होईल हे कवी चांदणीचे प्रतिक वापरुन सूचित करतो.

''उगवेल चांदणी ती सांगून चंद्र गेला
ह्या एकट्याजीवाला हसवून चंद्र गेला''[९] - (चांदणी)

विश्वास आणि प्रेम यांचे नाते अतूट आहे. विश्वासातूनच प्रेम फुलत असते. कवी आपल्या प्रियेला आपल्या प्रेमसंबंधात येणाऱ्या अडचणी समजावून सांगतो. आपले हे प्रेम समाजाला मंजूर असेलच असे नाही. तरीही मी बोलतो त्यावर तुझा विश्वास कसा नाही, असा प्रश्न कवी प्रियेला विचारतो.

''आपलीच माणसे उद्या छळतील दोघांना
माझ्या सत्य बोलण्यावर विश्वास तुझा नाही''[१०] - (विश्वास)

कवीने आपली वाट तिच्यासाठी बदललेली आहे. तरीही तिचा विश्वास बसत नाही. मग प्रश्न उरतो तो हा की, ती खरोखर तरी प्रेम करते का ?

''मळवाट सोडून आलो तुझ्या नव्या वाटेत
ठसे माझ्याच पावलांचे....विश्वास तुझा नाही''[११] -(विश्वास)

कवीचे प्रेम हे फक्त 'वाटण्याच्या' कल्पनेतले आहे. प्रत्यक्षात मात्र ते दिसत नाही. हे प्रेम मनाच्या कल्पनेवर तरंगताना दिसते.

''मी उद्या देईन तेव्हा तू ही ये नटूनी
माळेन मी केसात तुझ्या फुलांचा गजरा''[१२] -(गजरा)

मूळात आपण प्रेम करूनच चूक केली असे कवीने कबूल केलेले आहे.

''पहिल्याच प्रेमाने चौफेर गाजलो

इथे प्रेम करण्याची मी चूक केली''[१३] (चूक)

प्रेम कोणाला बरे आवडत नाही. पण ते सफल होत नसेल तर आपणही चूक करतो आहोत याची जाणीव होते. तशी ती कवीलाही झालेली आहे. रत्नाकरांच्या या प्रेमकवितेत सुरुवातीपासून शेवटपर्यंत एक लुटलेपण, अपुरेपण जाणवते. या अपुरेपणातून निर्माण होणारी ओढ, इच्छा ती ही अपूर्णतेतच मिसळते. हे तुटलेपण प्रेमातले आहे. कवीला कधी सफल प्रेमाचा अनुभव आलेला नाही. त्यामुळेच ही कविता प्रेमकविता म्हणण्यापेक्षा विरहविलापिका म्हणता येते. एकटा जगत असताना तिच्याशिवाय मनात भावभावना दाटून येतात त्या कवीने शब्दबद्ध केलेल्या आहेत. म्हणूनच कवी म्हणतो, मी जीवंत असताना तरी मला दारावरून हाकलू नको. आता जरी हाकललेस तरी शेवटचाही मार्ग तोच आहे.

''जिवंतपणी कधी नाही..... मेल्यावर मात्र

प्रेत होऊन जाईन दारावरून तुझ्या''[१४] – (दारावरून)

कवी रत्नाकरांच्या कवितेतील प्रीती ही कधी आर्त आहे, कधी अधाशी आहे, तशी ती हळूवारही आहे. कधी ती मिलनाची उत्कटता व्यक्त करते, तर मिलनातील सुखद अनुभव आवेशात सांगते.

''भिंतीला कान असतात तिचे मला सांगणे

सांगताना भिंतीपाशी एक चुंबन मागणे''[१५] – (निमंत्रणे)

दोन दिशा, वेगवेगळ्या दोन वाटा, या वेगवेगळ्या वाटेवरून जाणारी पण कधीकाळी काही काळासाठी का असेना एकत्र आलेली ही दोन मने आपापला भूतकाळ स्मृतीपटलावरून सरकवत आहेत. मात्र कवीला हे पूर्णपणे माहिती आहे की, आपण प्रेमात केव्हाच यशस्वी झालो नाही. प्रियेचे आणि कवीचे धागे कधीच जुळले नाहीत.

''तिचे अन् माझे जमले कधीच नाही

तिच्या विना मलाही गमले कधीच नाही''[१६] – (वादळ)

नेहमी अशी अधुरीच वादळे कवीच्या मनात उठवून जाणारी ही प्रेयसी कधीही कवीला पूर्णपणे साथ देताना दिसत नाही. कवी मात्र तिच्या विरहात स्वत:ला गुंतवताना दिसतो. कवी रत्नाकरांच्या या प्रेमकवितांचे परिशिलन करत असताना एक ठळक गोष्ट जाणवते ती अशी की, हॉटेल माझा देश मधील प्रेम कविता जशी आंबेडकरी

चळवळीतील कार्यकर्त्यांच्या जगण्याचे सामाजिक संदर्भ घेऊन आलेली वाटते तशी ती 'लक्तरांची गझल' मधील वाटत नाही. रत्नाकर हे या गझलांतून पूर्ण भावनिक पातळीवर लिहिताना दिसतात. त्यामध्ये एक सततची तुटलेपणाची जाणीव आहे. ती सफलतेकडे जाताना दिसत नाही. शेवटपर्यंत ही कविता आभासाच्या पोकळीत वावरताना दिसते. जरी कल्पनेच्या बेडीत ही कविता अडकली असली तरी ओढाताण मात्र कुठेही जाणवत नाही हे या गझलाचे वैशिष्ट्य आहे.

**२) स्वत:चे अनुभव मांडणारी गझल :**

कवी रत्नाकरांची 'लक्तरांची गझल' मधील गझल ही स्वानुभवातून आलेली आहे. तिला जगलेल्या भोगलेल्या दु:खाची झाक आहे. कवी रत्नाकरांना जगताना जे जे सोसावे लागले तेच त्यांनी या कवितेत उतरलेले आहे. दलित कवितेचे महत्त्वाचे वैशिष्ट म्हणजे ही कविता माणसाला केंद्रस्थानी मानते. ती समाजाभिमुख होते. त्यामुळे ती समग्र मानव्यांशी आपले नाते जोडते. म्हणूनच समग्र माणूसकीचा गहिवर या कवितेत येतो. कवी रत्नाकर हे बाबासाहेबांचे विचार पुढे घेऊन निघालेले चळवळीतील कार्यकर्ते आहेत. त्यामुळे चिरडलेल्या, भरडलेल्यांशी त्यांचे रक्ताचे नाते आहे. म्हणून ही कविता माणूस वगळून, मानवता वगळून होवूच शकत नाही. याच नात्यातून कवी रत्नाकरांची कविता ही माणसाच्याच मंगलतेचे अखंड स्तोत्र गाते.

चळवळीच्या कार्यकर्त्याला जगत असताना दैनंदिन जीवनात अनेक हालअपेष्टा सहन कराव्या लागतात. अपमान, मानहानी सहन करावी लागते. या कटू अनुभवातून हे सर्व सोडून द्यावे असे वाटते. पण ज्यांचा पिंढच अंधार दूर सारून प्रकाश देणाऱ्या मुक्तीदात्यांच्या विचारानी घडविला आहे तो या विचारांपासून कधीही ढळणार नाही. येणाऱ्या चांगल्या वाईट अनुभवासह कवीने येथे आपले मन मोकळे केलेले आहे. 'माणूस' या गझलेत कवी म्हणतो,

"आहे त्यातच सर्व मानणारी मी
माणसाला माणूस मानणारा मी"[१७] – (माणूस)

कवीच्या जे जे वाट्याला आलेले आहे ते आजचे नाही, त्याची परंपरा फार प्राचीन आहे.म्हणून कवी म्हणतो मी ते सहन केलेले आहे आणि माझ्या माणसांसाठी त्यांनी याचा बळी ठरू नये म्हणून अजूनही मला सहन करावे लागले तरी मी ते सहन करीन, मात्र माणसाला मी माणूस म्हणून कधीही विसरणार नाही.

सतत कवीच्या वाट्याला दु:खच इतके आलेले आहे की, सुख काय असते हेच विसरून गेलेले आहे. लक्तरांत वाढलेल्या कवीला उंची सौंदर्याची हाव कधीच नाही. या सौंदर्याच्या देखाव्यापेक्षा इथला माणूस महत्त्वाचा आहे. कधी कधी हे कष्ट उपसत असताना मन उदास होते. तेव्हा आपण काय करतो याचे नीट आकलन होत नाही. मनात गोंधळ निर्माण होतो. जसा या व्यवस्थेवरून विश्वास उडून जातो तसा स्वत:वरूनही जातो. या गोंधळलेल्या मानसिक अवस्थेत स्वत:लाच काही प्रश्न पडतात. कवी रत्नाकर लिहितात,

''रस्ता हातात घेऊन मी चाललो कोठे ?
माझे मला कळेना मी चाललो कोठे ?''[१८] – (रस्ता)

हे खरे की ही संभ्रमावस्था कायमसाठी नसते. या उदासिचे कारण कवी सांगतो की, उभ्या आयुष्यात हसणे कधी वाट्याला आलेच नाही. या भयाण, भयावह दारिद्र्यात हास्य असेलच कसे, हसू फुलते ते महालात आणि मी काही महाली संस्कृतीतला नव्हे. त्यामुळे हसणे हे इथल्या सर्वसामान्य कष्टकरी बहुजनाच्या वाट्याला येत नाही. येथे असते पोटाची वंचना, दु:खाची वेदना. कवी म्हणतो, गोठलेल्या दु:खातून हासू कसे जन्मणार ? ज्या भूके कंगाल वस्तीत भूक धुमाकूळ घालते तिथे हास्य जन्मूच शकत नाही.

''रडणाऱ्या डोळ्यांना मी कैक साद घातले
कालपर्यंत एकही मला प्रतिसाद नाही.''[१९] – (नोंद)

कवीच्या मनाची ही खंत आहे की, मी दु:खीतांच्या दु:खाचा वाटा उचलतो आहे. पण ज्यांच्यासाठी हे दु:ख सहन करावे नेमके तेच आपल्याला दूर लोटतात. वास्तविक ज्या समाजातून कवी आलेला आहे तो समाज आजही स्वतंत्र देशात पूर्ण विकसित, संस्कारीत झाला आहे, असे म्हणता येणार नाही. इथल्या दु:ख, यातना त्याच आहेत. त्यामुळे या समाजाची अशिक्षितता याला कारणही असेल. आंबेडकरी चळवळीतल्या कार्यकर्त्यांनी या गोष्टी कटाक्षाने टाळून समाजाला पुढे नेले पाहिजे. कवीची हीच भूमिका आहे. गेल्या अनेक पिढ्या ज्यांची अंधाराने साथ केली तो अंधार दूर घालवायचा असेल तर आपल्याला गौतम बुद्धांनी सांगितलेल्या तत्वाप्रमाणे 'स्वयंप्रकाशित' झाले पाहिजे. यासाठी कोणत्याही प्रकारच्या यातना सहन कराव्या लागल्या तरी सहन केल्या पाहिजेत.

"भरलो तुडुंब आता पिऊन अंधार हे

पण सदा माझ्यातूनी प्रकाशच गळतो"[२०] -(प्रश्न)

इथे दुःख मांडण्यासाठी सुद्धा शब्द नाहीत. फाटलेल्या पायाने पळावे लागते आहे. या अन्यायकारी व्यवस्थेला टक्कर देताना दुःख सहन करावे लागणार पण ही सारी दुःखे पचवून बाबासाहेबाचा हा सैनिक प्रकाशाचा वारसा जपतो. कवी म्हणतो, आता मी कोणाकोणाची मने ओळखत बसू आणि कोणाकोणाची मनधरणी करत बसू. त्यापेक्षा,

"उघडा नाघडा स्वभाव रे माझा

खुशाल कोणीही माझ्यात यावे"[२१] - (स्वभाव)

ज्याला यायचे असेल त्याने जरुन माझ्याबरोबर या. मी कोणाच्याही मनधरण्या करत बसणार नाही. वास्तविक आपला स्वभावच उघडा असल्याचे कवी सांगतो. कवीला या व्यवस्थेची चीड आहे. ती व्यवस्था संपविलीच पाहिजे. कारण ज्यानी ही निर्माण केली, त्यांनी आम्हाला हजारो वर्षांची गुलामी दिली. नरकमय यातनांचे जगणे आमच्या वाट्याला दिले. या सर्वांना आता सैल सोडून चालणार नाही. म्हणून कवीने लिहिले आहे,

"माझीया हातातूनी निसटलो काल मी

स्वत:कडेच उलटे दान मागू लागलो."[२२] - (खेळ)

माझ्या आणि माझ्या समाजाच्या वाट्याला ही घरंदाज गरीबी आलेली असली तरी मी ती निर्माण करणाऱ्या धनिकांच्या पुढे तिला टांगणार आहे असा विश्वास कवी देतो. कवीने अर्थहीन जगण्याला नकार दिलेला आहे. जरी आपले मरण अटळ असले तरी शेवटच्या क्षणापर्यंत लढत राहण्याची जिद्द कवीच्या मनात आहे.

"अर्थहीन जीवन मला जगणे मंजूर नाही

कळले कधीच सारे माझे मरण दूर नाही"[२३] - ( एकांतवासी)

आपण जर सामाजिक बांधिलकी स्वीकारत असेन तर, आपण अर्थहीन मरण्यापेक्षा आपल्या समाजासाठी कष्ट कवीला न्याय्य वाटते. या ऐकाकी झुंजण्यात सोबतीला जरी कोणीही नसले तरी मला त्यांची भीती नाही असे ठामपणे कवीने सांगितलेले आहे. कवी आपल्या निर्णयावर ठाम आहे. इथल्या अखंड मानवतेलाच कलंकित केले जात असताना आपण गप्प बसणे हे कवीला जमत नाही. म्हणूनच,

"काल जसा होतो तसा आज आहे
कालचाच माझा ठसा आज आहे"[२४] -(कवडसा)

इथल्या मानवतेच्या रक्षणासाठी हा आंबेडकरांचा वारसदार एक पाऊल सुद्धा मागे सरणार नाही. म्हणूनच कवी म्हणतो, कालचा माझा आवाज आजही तसाच आहे. याची काळालाही नोंद घ्यावी लागेल. असा आत्मविश्वास कवी देतो. कवी रत्नाकरांची ही कविता वाचत असताना हा आत्मविश्वास फाजिल वाटत नाही. तो अनुभवाच्या भट्टीत तावून सुलाखून आलेला वाटतो. कवीला एक प्रश्न सारखा सतावतो आहे की, आपण ऐवढे एकाकी लढताना, दुसऱ्यांच्या भल्यासाठी झगडत असताना लोकांना मात्र ते ढोंग वाटते. मग कवी स्वत:चेच आत्मपरिक्षण करू पाहतो. मी दुसऱ्याचे वाटोळे केले की, दुसऱ्यांनी माझेच वाटोळे केले अशी शंका कवीला सतावते.

"खरेच का कोणाचे वाटोळे केले
का कोणी माझेच उलटे वाटोळे केले"[२५] -(वाटोळे)

असा मनात प्रश्न निर्माण झाल्याने कवी निराश होतो. मात्र तो खचून निश्चित जात नाही. याचा परिपाक म्हणूनच की काय कवीला वाटते की, आता मीच सर्वांच्या चर्चेचा विषय बनलेलो आहे आणि माझ्यात होणाऱ्या बदलावर सर्वांचेच बोट आहे. जगण्यातला बदल हा अटळ आहे. जरी भूतकाळाला विसरता येत नसेल तरी, योग्य त्या भूतकालीन घटनांच्यावर प्रकाश टाकत आपण आपल्याला बदलून घ्यायलाच पाहिजे. या माझ्यातील बदलांचे ज्यांनी कौतुक केले त्यांनाच आता तो बदल सलू लागलेला आहे. कवी म्हणतो,

"कौतुक केलेल्यानी दुरुन शिव्या फेकल्या
त्यांनी ओळखावे..... मीच उपाय आहे"[२६] -(उपाय)

जरी ते मला शिव्या देत असतील, तरी शेवटी माझ्या शिवाय पर्याय नाही अशी ग्वाही कवी रत्नाकरांनी दिलेली आहे. ही बेताल बेभान व्यवस्था सहसा माणसांना आपल्यात सामावून घेत नाही. येथे संघर्ष हा अटळ असतो. या संघर्षात दोन देणे आणि दोन घेणे हे ठरलेलेच असते. कवी म्हणतो,

"ही बेभान वाहने मला ओव्हरटेक करतात
बेफिकीर त्यांचे धक्के मी बेफिकीर सोसतो."[२७] - (प्रवासी)

कवीच्या ठिकाणी आलेली ही बेफिकीरी सहसा आलेली नाही. या एकूण जगाव्या लागणाऱ्या परिस्थितीचेच ते अपत्य आहे. या अशा अवस्थेत संधीसाधू काही कमी नाहीत. संधी मिळताच ते आपल्या नावाचा ठसा उमटवून घेतात. या परिस्थितीत थोडी बेफिकीरी केली तर काहीच हरकत नाही. कवी म्हणतो मला जेव्हा खोटे बोलावे लागले तेव्हा मी खूप खोटे बोललो. मी जे संकल्प केले होते. जी स्वप्ने पाहिली होती त्यांच्याशीही मला खोटे बोलावे लागते.

"कैकदा भाकरीविना राहिलो मजेत
उपाशी पोटाशी खूप खोटे बोललो"[२८] – (खूप खोटे)

ज्यांच्या पाचवीलाच आठराविश्व दारिद्र्य पूजलेले आहे अशांना दोन वेळेचे पोटभर जेवण मिळेल याची खोटीच अपेक्षा करावी लागते. कारण आपल्याला हे माहीत असते की, आपण पोटभर जेवूच शकत नाही. त्यामुळे उपाशी पोटावर भरलेल्या पोटाचे समाधान मानावे लागते. एकंदरीत रत्नाकरांच्या या आत्मनिवेदनात फसव्या व्यवस्थेविषयी चीड आहे. रत्नाकरांनी कोणताही आडपडदा न ठेवता आपल्या मनातील भावभावनांना कवितेच्या माध्यमातून वाट मिळवून दिलेली आहे. जे मनात आले जे अनुभवले ते प्रांजळपणे रत्नाकरांनी या कवितेत व्यक्त केलेले आहे.

**३) जगण्यातील विषण्णता मांडणारी गझल :**

कवीचा जन्म हा दलित कुटुंबात झालेला आहे. त्यामुळे परंपरागत चालत आलेले आयुष्य कवी रत्नाकरांच्याही वाट्याला आलेले आहे. भारतीय दलित समाज हा अंध:कारमय गुलामगिरीच्या खोल गर्तेत अडकला होता. या समाजाच्या वाट्याला जे भयाण अंधकारी जगणे आले त्याची झळ कवी रत्नाकरांनीही सोसलेली आहे. म्हणूनच ते आपल्या कवितेत या विरोधी संताप व्यक्त करतात.

"आयुष्या तुझ्यावर नाराज नाही रे
तुझ्या विरोधी माझा आवाज नाही रे
कोपऱ्यात डोळ्यांच्या साठले पुरावे
गुन्हेगार काल होतो आज नाही रे"[२९] –(आयुष्या)

दलित पिढीतांना गुन्हेगार ठरवून, त्याच्यावर केले जाणारे अत्याचार या अत्याचारांचा सामना करून खरे गुन्हेगार कोण आहेत हे दाखविण्याचे काम कवी रत्नाकरांनी केलेले आहे. खरे गुन्हेगार कोण आहेत याचे पुरावे असताना देखील

आम्हालाच गुन्हेगार ठरविले जाते. तरीही मी आता या आयुष्यावर नाराज नाही. कारण मी नाराज झालो तर मग डॉ. बाबासाहेबाची चळवळ पुढे जाणार नाही. म्हणून मी आता कोणत्याही संकटाना तोंड द्यायला सज्ज आहे असा विश्वास कवीने दिलेला आहे. येणारा प्रत्येक दिवस अपमान आणि छळ घेऊन आला तरी मी त्यांना घाबरत नाही. माझा समाज मला पुढे नेला पाहिजे. गुलामगिरीला नकार दिला पाहिजे. यासाठी आपण मात्र सतत आशावादी असायला हवे असे कवी सूचित करतो.

आपल्या मुक्ती दात्यांनाच इतका अपमान सहन करावा लागला तर मग तुम्ही आम्ही या अपमानाने खचून का जावे.

''अपमान त्यांनी दिलेले गळ्यात माळले मी
सन्मान थोर माझा भाग्यवान मानले मी''[३०] -(भाग्यवान)

प्रस्थापित व्यवस्थेच्या बंदिस्त चिरेबंदात हार ही अटळ आहे. आम्ही मात्र प्रत्येकवेळा जिंकलोच आहे. पण या व्यवस्थेने आपली जीत कधी मान्यच केलेली नाही. इतिहास आम्ही घडविला श्रेय मात्र त्यांनी लाटले, तेव्हा विजयात हार मानणारा हा बाबासाहेबाच्या चळवळीतीलच असायला हवा. त्याच्याशिवाय ते कोणालाही शक्य नाही. कवी म्हणतो म्हणूनच मी निवडलेला मार्गच खरा आहे. माझे हे सर्व आयुष्य या मार्गात ओतावे लागले तरी मी ते ओतेन पण माझ्याच मार्गाने चालेन. आपल्या मार्गावरून पतित न होणे हेच दलित कवितेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. चळवळीचा वारसा सांगणारी ही कविता सामाजिक बांधिलकी नाकारत नाही. कवी हा व्यवस्थेच्या रगड्यात रगडल्या गेलेल्या समाजातील आहे. त्यामुळे अठराविश्व दारिद्र्य हे त्यांच्या घरात वस्तीलाच आहे. अस्पृश्य म्हणून, अपमान, छळ सहन करावे लागतात. निसर्गाने निर्माण केलेल्या व कोणत्याही माणसाच्या वैयक्तिक मालकीच्या नसणाऱ्या पाण्यासाठी सुद्धा लढावे लागते. भाकरीची भीक मागावी लागते. सक्तीने जोहार घालावा लागतो. मनात नसले तरी गुलाम व्हावे लागते. या सर्व असहाय्य गोष्टींना तोंड देतच हा आंबेडकरी समाज बाबासाहेबाच्या विचारांच्या प्रकाश दिप्तीने प्रकाशमान झाला व लढ्यासाठी उभा ठाकला. त्यांच्यात आत्मविश्वास व स्वाभिमान निर्माण झाला. आपल्या समाज बांधवांची उन्नती आपणच करायला हवी याची जाणिव झाली. म्हणूनच कवी लिहितो,

''चारी बाजूला फाटलेला फाटत मी चाललो
फाटलेली लक्तरे वाटत मी चाललो.''[३१] -(लक्तरांची गझल)

बाबासाहेबाचा हा लढाऊ सैनिक मुळातच फाटका आहे. असे असले तरी बाबासाहेबाच्या विचाराप्रमाणेच तो मार्गक्रमण करतो आहे. आपली सामाजिक बांधिलकी मान्य करून आपल्या अंगावरील फाटकी लक्तरे सुद्धा वाटतो आहे याचा कवीला अभिमान आहे.

दीन-दलिताच्या, पिढीतांच्या भुकेकंगाल वस्तीत कुठले ताजे तुकडे आणि कुठली पक्वान्ने. इथल्या प्रत्येकाला पोटाची आग विझवण्यासाठी तासन्‌तास उकिरंड्यावर तिष्टावे लागे. उष्ट्या पत्रावळ्या चाटाव्या लागत. हा पूर्वेतिहास कवी विसरत नाही. यासाठी किती यातना सहन कराव्या लागल्या असतील. म्हणून कवी म्हणतो,

''भेटले अनेक मला माझ्यावानी फाटलेले
त्याच्यासाठी एकेक चिंधी टाकत मी चाललो''[३२] -(लक्तरांची गझल)

हा बाबासाहेबाचा वारसा कवीने चालविला आहे. या व्यवस्थेत चिरडलेला भरडलेला आपला बांधव, त्याच्यासाठी आपणही झगडले पाहिजे असे कवीने प्रतिपादिले आहे. शेवटी सगळे करूनदेखील निराशा पदरी येते असेच या शीर्षक कवितेतून कवीला सूचवावयाचे आहे. कवीला वाटणारी ही विषण्णता गडद होत जाते. आपण कितीही कष्टलो तरी त्या कष्टाला मोल नसते. शेवटी समाज नावे ठेवायचा तसा ठेवतच असतो. मग ज्यांच्यासाठी आपण झिज सोसायची त्यानीच दगा दिला तर,

''मी ज्यांचे भले केले
त्यांनीच वार केले
त्यांना नेलेही पुढे
मलाच दूर केले ''[३३] (कंगाल)

कवी म्हणतो ज्याला मी माझे समजून पुढे नेले त्यानीच मला बाजूला केले. मग अशावेळी समाजावरला, सहकारी मित्रावरला विश्वास उडून जातो व आपण हे सर्व का करतो आहोत याचा पश्चाताप होतो. कवी म्हणतो, इथे माझ्याबरोबरच निरापराधांना शिक्षा भोगावी लागते. चोर मात्र सलामत असतात. अशावेळी प्रत्येकजण आपली ओळख विसरतो. कवीला हे सर्वच चेहरे अनोळखी वाटतात.

''मी काल वेड्यापरी भूतकाळ उकरला
ओळखीचे चेहरे भासले अनोळखी''[३४] -(अनोळखी)

शेवटच्या क्षणी हे सर्व प्रश्न, सर्व चेहरे अनोळखी वाटतात. कवी रत्नाकर म्हणतात, मी अखेरपर्यंत ज्या रस्त्यावरून चाललो तो रस्ताही आता ओळख विसरलाय. त्यामुळे रोजच नवनवी दु:खे वाट्याला येताहेत. कवी या वेदना सहन करतो.

समाजात, चळवळीत काम करत असताना जे सोसावे लागते ते प्रत्यक्ष काम करणाऱ्यालाच माहिती असते. आपलीच माणसे दगा देतात, फसवतात, तेव्हा होणारी वेदना ही भयानक असते. तरीही कवी ते सहन करून समाजात आणि अनेक प्रश्नाच्या रणधुमाळीत स्वत:ला झोकून देतो. कवीला ठाऊक आहे की, याशिवाय आपला समाज तरू शकणार नाही.

४) **व्यवस्थेविरोधी चीड व्यक्त करणारी गझल :**

डॉ. बाबासाहेबानी जो मानव मुक्तीचा लढा दिला, अनेक शतकांच्या अंधाऱ्या वस्तीत प्रकाशाचे दीप पेटविले, अंधारात चाचपडणाऱ्या दलित जनतेला शिका, संघटीत व्हा, संघर्ष करा हा जो संदेश दिला, तो संदेश घेऊन व बाबासाहेबाचे तत्त्वज्ञान आत्मसात करून, ज्यांनी प्रथम इथल्या अन्याय, अत्याचाराला विरोध केला. ही संस्कृती आपली नाही हे कळल्यावर क्रांतीसाठी जी पिढी सज्ज झाली त्यांच्याच संघर्षातून ही कविता जन्माला आली आहे. गौतम बुद्धांच्या अहिंसेचा वसा घेऊन ही कविता वाटचाल करते आहे. हजारो वर्षांच्या अन्याय, अत्याचाराला प्रतिकार करण्यासाठी तिचे सौम्यपण हे धोक्याचेच होते. म्हणून ही कविता, विद्रोही बनून क्रांतीतून मुक्तीची भाषा बोलते. बाबासाहेबाच्या क्रांतीच्या विचारांवर ही कविता पोसलेली आहे. डॉ. बाबासाहेबाच्या क्रांतीच्या प्रगल्भ विचारांवर ही कविता पोसली असल्यामुळेच ती या व्यवस्थेची, संस्कृतीची, चिकित्सा करू लागली. याच तिसऱ्या पिढीतील रत्नाकरांची कविता ही क्रांतीचीच भाषा बोलते.

“सूर्य मला सांगून गेला आता पुन्हा रडू नको
देश पेटवाया निघालेल्यांना सैल सोडू नको”[३५] (सूर्य)

डॉ. बाबासाहेबाच्या रूपाने जो प्रज्ञा सूर्य अवतारला त्या प्रज्ञा सूर्यानेच आदेश दिलेला आहे की, ज्यांनी स्वातंत्र्य आपल्या घरात नेले त्याचा उपयोग आपल्यासाठीच केला त्यांना सैल सोडू नका. कारण ज्यांचे रक्त पिऊन हे स्वातंत्र्य मिळाले, त्यांच्यासाठी आजही ते एक अफवाच राहून गेलेले आहे. रत्नाकरांनी या स्वातंत्र्याचे स्वागत केलेले आहे. पण ज्यांनी इथल्या बहुजणांचे स्वातंत्र्य हिरावून घेतले त्यांच्याबद्दल कमालीचा राग आहे.

तथागत गौतम बुद्धांचा वारसा सांगणारा हा कवी शांतीसाठी बुद्धांनी जी क्रांती केली त्यांचे स्मरण ठेऊन आपल्याला याच क्रांतीच्या वादळात दिवा लावण्याची शपथ आहे असे ठणकावून सांगतो. डॉ. बाबासाहेबानी देशाला घटना दिली. घटनेनेच आम्हाला समतेचे तत्त्व दिले. या समतेच्या लोकशाही विषयी कवी रत्नाकरांनी आदर व्यक्त केलेला आहे आणि म्हणूनच बाबासाहेबानी मुक्तीसाठी धर्म सोडला. त्या अन्यायकारी धर्मात पुन्हा कधी जाणार नाही असे कवी विश्वासाने सांगतो.

सुधारणेच्या नावाखाली चाललेले ढोंग किती फसवे आहे. या फसवेगिरीचा रत्नाकरांना राग आहे. बाहेर स्त्री मुक्तीच्या घोषणा करायच्या आणि देव्हाऱ्यात यल्लुबाईचा 'टाक' पूजायचा अशी ही पोकळ सुधारणावृत्ती कवीला खटकते. जिथे माणसाणेच पृथ्वीवर स्वर्ग निर्माण केला तिथंच माणूसकीची चाललेली चेष्टा पाहून कवी मन विषण्ण होते. आता माणसापेक्षा शेंदूर फासलेल्या दगडांना फार महत्त्व आलेले आहे. एका बाजूला बहुसंख्य समाज अन्नाच्या शोधात धावत असताना दुसऱ्या बाजूला ह्या निर्जिव दगडांच्या देवाना मात्र दुधाचा अभिषेक घातला जातो. या विसंगत समाज मनोवृत्तीवर कवी हल्ला करतो. या व्यवस्थेविरोधी निषेध नोंदवतो.

> ''शेंदराच्या दगडाला दुधाचा अभिषेक.... अन्
> भुकेले मन तिथेचं.... माणुसकीचा जोक आहे''[३६] -(हाक)

ज्यांच्या मनात या विसंगतीबद्दल चीड आहे ज्यांना या व्यवस्थेत हस्यास्पद जगावे लागते आहे अशा सर्वांना कवी आव्हान करतो की, तुम्ही माझ्याबरोबर या आपण क्रांतीची मशाल पेटवून या विसंगतीला कायमची जाळून टाकू. म्हणजे माणसातील माणुसपणा शास्वत राहील. या व्यवस्थेत जगताना प्रत्येक पाऊल सावध उचलावे लागते. कारण जेव्हा आपण या दलदलित येतो तेव्हा आपले अस्तित्वच हरवून जाण्याची भीती असते. जो तो स्वत:च्या स्वार्थासाठी वाटेल ते कृत्य करण्यास तयार असतो. कवी म्हणतो आता माणसांना फारसी किंमत उरली नाही. ज्यांच्याकडे संपत्ती, सत्ता आहे तो सर्वश्रेष्ठ ठरतो आहे. आणि ही व्यवस्थाही अशानाच जगविण्याचे काम करते. सर्वसामान्य माणूस मात्र त्यांच्या पायाखाली चिरडला जातोय.

> ''तुडवीत होते..... खाली पाडून माणसांना
> चुकताच तुम्ही मर्दा.... सांगू इथे कोणाला ? [३७] -(गर्दीत)

कोणाला सांगावे की, तुम्ही चुकताय. हाच खरा प्रश्न आहे. ही व्यवस्थाच इथल्या शोषकांच्या शोषणाला पोषक असेल तर शोषक हे शोषणारच. म्हणून ही शोषणयुक्त व्यवस्थाच बदलून टाकण्याची गरज कवीला वाटते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी गुलामीला जाहीर नकार देऊन जिवंत असून मृतप्राय झालेल्या माणसांना प्रकाश दिला. नवी संजिवनी दिली. त्याच प्रकाश पूत्राचा वारसा घेऊन चालणाऱ्या कवीला वाटते की, आता बाबासाहेब आपल्यात नाहीत. तेव्हा बाबासाहेबाचे अपुरे राहिलेले काम आपल्यालाच पूर्ण करायचे आहे. म्हणून अजूनही अंधारात असणाऱ्या माझ्या बांधवांच्या झोपडीत प्रथम मला दिवा लावायलाच पाहिजे. बुद्धांची समता प्रस्थापण्यासाठी रस्त्यात समतेची झाडे लावली पाहिजेत. या असमान व्यवस्थेला नाकारले पाहिजे. तरच माणूस माणसांशी समानतेने राहील. हे जरी कठीण काम असले तरी ते मला केले पाहिजे आणि हे करत असताना या व्यवस्थेला शरण न जाण्याचा निर्धार कवी करतो.

''वाहिलीत ओझी तुमची माझ्या बापाने
ओझी गुलामीची मी जाहिर पेटविणारा''[३८] -(दिवे)

गेली कित्येक वर्षे माझ्या अनेक पिढ्यांना तुम्ही गुलाम केले. त्यांना गुलामीची ओझी वहायला लावलीत, पण आता मात्र ते चालणार नाही. कारण या गुलामीला जाळण्याची सुरूवात माझ्या भीमानेच महाडातकेलेलीआहे. म्हणूनच ही पारंपरिक गुलामीची ओझी मी जाहिरपणे पेटविणार आहे. हे काम करण्यासाठीच मला आता थकलेल्या पावलांना गती दिलीच पाहिजे. ती गती देणे हे कवी आपले प्रामाणिक कर्तव्य समजतो. कवी आपल्या बांधवांना सूचना देतो की, अरे आता तरी गुलामी झुगारून दया. फक्त मोकळ्या गप्पा मारू नका. उठा डॉ. बाबासाहेबाच्या रूपाने आम्हाला पहाटपक्षी जागे करून गेलेला आहे, गुलामीला विरोध करा, महारवतने बंद करा, घाण कामे करू नका, असे साांगितले असताना अजूनही हीच गुलामी आपण स्वीकारतोय. हे आता बंद झाले पाहिजे.

''गावकी भोवऱ्यात बुडालात तुम्ही
ढोरे ओढण्याचे आता बंद करा ''३९ -(बंद करा.)

आपला शत्रू कोण आणि मित्र कोण हे आपण ओळखायला शिकले पाहिजे. दु:खांना कवटाळून बसण्याचे दिवस आता संपलेले आहेत. तेव्हा क्रांती शिवाय पर्याय

नाही. ही क्रांती गुलामीच्या बेड्या तोडण्यासाठी असेल. तेव्हा कोणीही स्वस्थ बसू नका. रणधुमाळी अटळ आहे. सावध रहा असे आपल्या समाजबांधवाना कवी कळवळ्याने सांगतो आहे.

### ५) दलित चळवळीतील अंतर्गतता मांडणारी गझल :

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आयुष्यभर ज्या तळमळीने आणि जोमाने वाढविलेली चळवळ बाबासाहेबांच्या नंतर कितीकाळ तग धरून राहिली हा चिंतनाचा विषय आहे. डॉ.बाबासाहेबाच्या पश्चात चळवळीचे काय झाले याचे साक्षीदार कवी रत्नाकर स्वत:आहेत. तीन साडेतीन दशकात चळवळीची जी विकलांग अवस्था झाली नेतेपदाच्या चढाओढीत दलित चळवळीची झालेली शकले आणि बाबसाहेबांच्या नेतृत्वाखाली एकसंघ असलेल्या दलित जनतेत पडत गेलेली फुट, यावर कवी रत्नाकर गांभिर्याने बोलतात.आपल्या या संग्रहाच्या प्रस्तावनेत ते म्हणतात, ''हया सर्व गझला मी पाहिलेल्याच नव्हे तर अनुभवलेल्या चळवळीचा पुरावा आहे. जे वास्तव डोळयांना दिसले, ते आहे तसं इथं मांडलय.''[४०]

वास्तविक दलित चळवळ या तीन दशकात वाढायला हवी होती. तसी ती वाढलेली नाही. म्हणूनच कवी रत्नाकरांसारख्या अनेक कार्यकर्त्याचा भ्रमनिरास झाला. या एकूण अवस्थेवर भाष्य करताना कवी म्हणतो,

''आंबेडकरी जन आंदोलन एक नवे नाटक
पडदा वर व्हायच्या आधीच लाचारीत अटक.''[४१] -(आंदोलन)

आंबेडकरी जनतेने बाबासाहेबाच्या बरोबर उभारलेले हे आंदोलन, ही चळवळ जेव्हा स्वार्थी नेत्याच्या हातात गेली तेव्हा कवीला खूपच वाईट वाटले. ज्या ध्येयापोटी बाबसाहेबांनी चळवळ वाढविली ती ध्येये सगळीच यानी पायदळी तुडवून टाकली. ज्यांच्या हातात ही चळवळ जायला नको होती. त्यांच्याच हातात ती गेली. आणि व्हायचे तेच परिणाम झाले. याचा एकीकडे कवीला राग आहे, तर दुसरीकडे मात्र वाईट वाटते. ते या नेत्यांच्यावर विश्वास ठेऊन आपले नुकसान करून घेणाऱ्या जनतेचे. कवी रत्नाकर म्हणतात इथे प्रत्येकाचे तोंड नेतृत्त्वाच्या रक्तासाठी आसुसलेले आहे. प्रत्येकालाच नेतृत्त्वाची चटक लागलेली आहे. हे नेतृत्व मिळविण्यासाठी काही वाटेल ते होवो. ही वृत्तीच चळवळीला कलंकीत आणि बदनाम करणारी आहे. खरे बोलणाऱ्याला धमकी दिली जाते. मी ज्यांच्यामुळे चळवळीत गेलो. ज्यांच्या बैठकीत बसलो व त्यांची चुकीची धोरणे नाकारली. त्यांची गुप्त खलबते समाजाला सांगितली

तेव्हा त्यांनी माझ्यावरही प्रहार केले. माझे असे बिनधास्त बोलणे त्यांना कधीच रूचले नाही.

"बिनधास्त बोलणे .... अंगवळणी पडले आहे.

बोललास जर पुन्हा .....? तो धमकी देऊन गेला"[४२] -(धमकी)

बाबासाहेबाच्यानंतर दलित चळवळीचे काय झाले. बाबासाहेबानी अखंड दलित समाज एका छत्राखाली आणण्यासाठी रिपब्लिकन पक्षाची स्थापना केली. मात्र बाबासाहेबाच्यानंतर निघालेल्या या रिपब्लिकन पक्षाची अवघ्या काही वर्षातच अनेक शकले झाली. मग कोणी सत्तेसाठी युती केली. ती अनेकवेळा फसली. एकीकरणाच्या अनेकवेळा घोषणा झाल्या. तरी आजदेखील हे एकीकरण साधलेले नाही. ज्यांनी ह्या ऐक्याच्या घोषणा केल्या, ठराव केले त्यांनीच पुन्हा हे ऐक्य मोडून पक्षांतर केले. स्वार्थासाठी इतरांशी युती केली. आजचे चित्रदेखील याहून काही वेगळे नाही. प्रत्येक नेता गटागटात वाटला गेलेला आहे. म्हणूनच या एकूण भोगळ अवस्थेविषयीची चीड रत्नाकरांनी व्यक्त केलेली आहे.

"पक्षाचा जाहिरनामा कलम एक नामांतर

सत्तेसाठी फाटाफूट किती गट समांतर"[४३] -(युती)

दलित जनतेने बाबासाहेबाच्यानंतर एका चांगल्या नेतृत्त्वाची अपेक्षा केलेली होती. ती अपेक्षा ह्या गटातटाच्या राजकारणाने पूर्ण धुळीस मिळविली. त्यामुळे ऐक्य राखण्याच्या फक्त घोषणा झाल्या. मात्र ऐक्य काही आजपर्यंत झालेले नाही. हे दलित जनतेच्या दृष्टीने हितावह नाही. इथल्या प्रतिगामी शक्तींना टक्कर द्यायची असेल तर ऐक्य किती गरजेचे आहे हे वेगळे सांगावयास नको.

दलित चळवळ आज विस्कटलेल्या अवस्थेत जगते आहे. बाबासाहेबानी दिलेली तत्त्वे पायदळी तुडविली जात आहेत. त्यांनी दलितांच्या उन्नतीचे उरी जपलेले स्वप्न आज अपंगावस्थेत चाचपडते आहे. त्यामुळेच पूर्वीची जी दलित पिढीतांची अवस्था होती. त्यात काहीही फरक पडलेला नाही. म्हणूनच कवी मार्गदात्याला म्हणतो. मी जेव्हा जेव्हा या लढाईत लढताना हारतो तेव्हा तेव्हा तूच मला या कारागृहांच्या बंदीखाण्यात दिसतोस आणि माझ्या धास्तावल्या मनाला दिलासाही देतोस. म्हणून तुझा पुतळाही त्यांना रूचत नाही. त्याची विटंबना होते. तो फोडला जातो, तेव्हाही तू

त्यांच्याकडे बुद्धाच्या करूण डोळ्यांनीच पाहतोस. आजही दलितांच्यावरील अत्याचार बघून तुझ्या डोळ्यात पाणी येत आहे. जे पूर्वीही असेच वाहत होते.

''आमच्या रांगा भत्यासाठी..... कोंड्या चपातीसाठी
नजरा पाहून तूही...... रांगेत उभा राहतोस''[४४] -(कारागृहात)

ही दलितांची आजची अवस्था देखील तू ज्यांच्या खांद्यावर जबाबदारी टाकलीस त्यांना दिसत नाही. ते सर्वांना विसरून सत्तेच्या पाठी लागलेले आहेत आणि आम्ही मात्र पोटाची आग जाळणाऱ्या भाकरीसाठी रांगेत उभे आहे. बाबासाहेबाच्या नंतर दलितांची जी दारूण अवस्था झालेली आहे त्या अवस्थेवर कवी रत्नाकरांनी प्रकाश टाकला आहे.

चळवळीतील अंतर्गत हेवेदावे, संघर्ष यावर भाष्य करताना कवी 'मा.मु.' या गझलेत म्हणतो,

''नाकात ठेवला तुम्ही एक जवान मोती
नाकापेक्षा मोठा होताच तुम्ही नाक कापलं ''[४५] - (मा.मु.(?)

या मतलबी नेत्याच्या मुळे जी चळवळ दुभंगली त्यांच्याने ती पुढे चालवणे होत नाही म्हणून या चळवळीचा डोलारा आम्ही आमच्या खांद्यावर घेतला. आम्ही समर्थपणे कार्यरत झालो. जेव्हा आमचा जयघोष झाला तेव्हा त्यांचे मन फाटले. ही माझी तुझीची भावना या चळवळीतून वगळून एका दमाने, एका दिलाने नेत्यांनी, कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन बरोबर जायला हवे. ही आजची आणि इथून पुढच्या काळाची गरज आहे.

मराठवाड्यात जो नामांतराचा उठाव झाला त्यात अनेकांना प्राण गमवावे लागले. या अमानूषतेचा धिक्कार करत आम्हाला नामांतर का पाहिजे ते कवीने सांगितले आहे.

''आमच्या अनेक प्रश्नांचे नामांतर उत्तर नाही
एक उत्तर हवेच म्हणून हवे नामांतर''[४६] -(नामांतर)

ज्या अनेक प्रश्नांसाठी आम्ही लढतो आहोत त्यातील नामांतर हा एक प्रश्न आहे. इतर पुष्कळ बाकी आहेत. तेव्हा नामांतर हा आमच्या तमाम दलिताच्या अस्मितेचा प्रश्न आहे. आणि म्हणूनच आम्हाला नामांतर हवे असे कवी ठणकावून सांगतो.

भारतीय दलित समाज अनेक शतकांच्या वर्णव्यवस्थेला, जाती व्यवस्थेला आणि यांच्या सर्वांच्या योगातून निर्माण होणाऱ्या अन्यायाला कंटाळलेला आहे. मरण यातनाच्या कळा सोसत आमचीच माणसे या अत्याचाराचा बळी ठरलेली आम्ही पाहिलेली आहेत. हे आजचेच नाही तर यात आमच्या अनेक पिढ्याच्या पिढ्या संपून गेलेल्या आहेत. पावला, पावलावरचा अपमान आता सहन होत नाही. मी आता बोलू शकतो. तेव्हा कवी म्हणतो गौतमा मी तुझ्या धम्माला, संघाला शरण गेलेलो आहे. तुझी अहिंसा मी तंतोतंत पाळलेली आहे. पण आता आमची सहनशीलता संपलेली आहे. नालंदा आणि तक्षशीला यांच्या ज्वालांचा दाह अजूनही कमी झाला नाही तोवर इथे झोपडी बरोबर माणूसही पेटविला जातोय. ज्यांने हजारो वर्षांचा काळा कभिन्न अंधार दूर करून या अंधारातील जीवांना प्रकाश दिला त्या आमच्या मुक्तिदात्या प्रकाश पूत्राचा पुतळाही त्यांच्या डोळ्यात खूपतो आहे. कवी म्हणतो, मग सांग गौतमा मी आता हे कसे सहन करू. गौतमा मी तुला कधीच टाळले नाही. तुझ्या पंचशीलेसाठी जूने सर्व त्यागले. हिंदू धर्म त्यागला. त्यातील देव त्यागला सर्वकाही त्यागले. मग सांग आता आमच्यावर हा अन्याय का ? आता मात्र हे सर्व सहनशीलतेच्या पलिकडे गेलेले आहे. कवी रत्नाकर बुद्धाला म्हणतात,

> ''एक तत्त्व असे दे की.... हिंसाच व्हावी
>
> का सांग मीच करू बदल योग्य तो''[४७] – (गौतमा)

माझ्या अंगी जी आग आहे त्या आगीने मी ही व्यवस्थाच भस्मसात करतो. तेव्हा फक्त एकहिंसेचे दान कवी बुद्धाच्या अहिंसेला मागतो आहे.

कवी रत्नाकरांची कविता दलित चळवळीवर भाष्य करत असताना आक्रमक होते. कोणताही आडपडदा न ठेवता चळवळीचा पट ती सर्वांसमोर मांडते. फसलेली दलित चळवळ, फसलेले व आज गटागटांत वाटलेले नेते त्यांच्या पोकळ घोषणा यावर कवीने नेमके बोट ठेवलेले आहे. दलित चळवळीत माजलेल्या दुहीवर भाष्य करून, भविष्यात दलित चळवळीच्या भवितव्याविषयी भाष्य केलेले आहे. आपली उन्नती आपण साधायची असेल तर, संघटीतपणे संघर्ष करीत पुढे जाण्याची गरज आहे, असे रत्नाकर सांगतात.

### ६) डॉ. बाबासाहेबाच्या विषयी आदर व्यक्त करणारी गझल :

ज्याने प्रकाश दिला, ज्यांने स्वत:ची भाषा दिली, त्या प्रकाशातच दलितसमाज आज अस्मितेने जगतो आहे. कवी बाबासाहेबांना चंद्राची उपमा देतो. कारण या

भयंकर व्यवस्थेविरोधी त्यांनी जो लढा दिला, त्यातून त्यांना सोसावे लागलेले चटके त्यांनी बुद्धाच्या सहनशीलीतेने सोसले. चंद्रासारखे ते शीतल राहिले. अन्याय, अत्याचारांना पोटात घालून वेशीबाहेरच्या वंचितांच्या 'कुडांच्या' प्रत्येक काठी काठीला हसवून गेलेला, या प्रत्येक काठीला सत्त्व दिलेला हा प्रकाशसूत्र होता. म्हणून कवी लिहितो,

"तेलावाचून खोळंबलेल्या रित्या दिव्यांना
स्वयं प्रकाशित वाती देऊन काल गेला"[४८] (चंद्र)

ज्यांने माणसाला माणुसपण दिले, माणसातल्या माणुसकीची प्राणपणाने जपणूक केली, त्या माणुसकीच्या त्रात्या बाबासाहेबाना, त्यांच्या कार्याला कवी अभिवादन करतो. कवी रत्नाकर म्हणतात की, त्यांनी माणूसकीच्या चंद्रकला प्रत्येक दलितांच्या घराघरात ठेवलेल्या आहेत. असे असले तरी एक खंत कवीच्या मनात आहे की, याच महामानवाला त्यांच्याच अनुयायांनी गटागटात वाटून घेतलेले आहे.

"गटागटात आम्ही तुला वाटून घेतले
वेळी अवेळी स्वार्थासाठी चाटून घेतले"[४९] (वाटणी)

ज्या महामानवाने आपले आयुष्य इथल्या दीनदलितांच्या उद्धारासाठी खर्ची घातले, ज्यांनी अखंडतेचे स्वप्न पाहिले ते स्वप्न त्यांच्या पश्चात पुरे झालेच नाही. उलट त्यालाच गटागटात वाटून घेतले गेले. तुझ्या नावाचे भांडवल करून आपला स्वार्थ साधला. सोयीनुसार तुला वापरले. ज्यांनी नटव्यापणाणे धम्म स्वीकारला आहे ते तरी कुठे धम्माचे पालन करीत आहेत. एक काळ असा होता की तुझ्या एका शब्दावर हजारो स्वत:ला झोकून देत होते. मात्र आजचे चित्र वेगळे आहे. या स्वार्थी, अनास्थी वृत्तीची चीड कवी रत्नाकरांनी या गझल संग्रहातून व्यक्त केलेली आहे.

### ७) समाजातील ढोंगीपणावर प्रकाश टाकणारी गझल :

ज्यांच्यासाठी आपण उपयोगी पडावे त्याचे काम झाले की, ते आपल्याला विचारत नाहीत. सारे आपापल्या स्वार्थाचाच विचार करतात. या स्वार्थीवृत्तीवर कवी रत्नाकर तिखट शब्दात प्रतिक्रिया देतात.

"ज्यांना साथ दिली तेच टाळतात मला
ज्यांना दिली नाही तेही टाळतात मला"[५०] -(टाळतात मला)

ज्यांना आपण संकटसमयी मदत केली ज्यांच्यासाठी रात्रंदिवस झगडलो ते सर्वजणच आता टाळू लागलेले आहेत. याचा कवीला खेद वाटतो. 'कामापुरता मामा' ही माणसांची वृत्ती कवीला खटकते. जरी तो आपला असला तरी कामापुरता जवळ येतो. काम संपले की विचारत देखील नाही. अशी कवीने मनातली खंत व्यक्त केलेली आहे. समाजामध्ये असा एक गटच कार्यरत असतो. तो चांगले करणाऱ्यांना नावे ठेवतो. रत्नाकरांच्या बाबतीतही असेच घडलेले आहे.

''पाहताक्षणी मला त्यांचे चेहरे विझून गेले
जे होते बोलणारे तेही मुक्याने निघून गेले.''[५१] (चेहरे)

आपण जोपर्यंत त्यांची गुलामी मान्य करत होतो तोपर्यंत ते चांगले म्हणत होते. मात्र ही गुलामी कवी जेव्हा नाकारतो तेव्हा ते कवीला बहि:ष्कृत करतात. या अशा प्रवृत्तीवर भाष्य करून असे वागणे ठिक नसल्याचे कवीने नमूद केलेले आहे.

आपण काय करतो आहे याचे भान आणि जाण नसणारी ही मंडळी समाज व्यवस्थाच बिघडवायचे काम करू लागले आहेत. या वाईट प्रवृत्तीचा निषेध नोंदवून अशा ढोंगी, प्रवृत्ती समाजातून कायमच्या संपवायला हव्यात. तरच सर्वसामान्य समाज सुस्थितीत राहील असा कवीला विश्वास वाटतो.

### ८) या संग्रहातील इतर गझला :

या संग्रहात कवीने वेगवेगळा आशय विषय प्रकट करणाऱ्या काही गझला लिहिलेल्या आहेत. आजपर्यंत शब्दांत न बसलेला कोणता विषय असेल तर तो 'आई'. जिच्यामुळे आपल्याला या विश्वाचे ज्ञान मिळते. जी स्वत: उपाशी राहून आपल्या मुलांना खाऊ घालते, आपल्या पदराची सावली देते. ती आई ! मराठी साहित्यामध्ये आजपर्यंत अनेकांनी आईवर कविता लिहिल्या आहेत. तरीही शब्दांपलिकडे असणारी आई अजूनही अपूरीच वाटते. कवी रत्नाकरांनीही 'आई' शब्दात बसवायचा प्रयत्न केलेला आहे. कवी म्हणतो आम्हाला बाप माहीत नाही. आईच आमचा बाप होती. कारण तिने रात्रंदिवस आमच्यासाठी जे कष्ट उपसले,परिस्थितीशी टक्कर दिली. आपले आणि आमचे पोट जाळण्यासाठी तिला काय काय करावे लागले, किती यातना सहन कराव्या लागल्या ह्या तिलाच ठाऊक. रत्नाकरांनी रेखाटलेली आई ही या प्रस्थापित व्यवस्थेची बळी ठरलेली आहे. आपले आणि आपल्या मुलांचे पोट भरण्यासाठी तिला आपल्या शरीराचा सुद्धा व्यापार करावा लागतो आहे.

"रातदिस आई बसली आमच्या पोटासाठी

पोटास्तव बसण्याचा तिचा वारसा पाहिला मी"[५२] -(वारसा)

मात्र ज्या व्यवस्थेने तिला या अवस्थेला आणले त्या व्यवस्थेची कवीला चीड येते. वास्तविक ही आई बापाच्या पश्चात्य आपल्या मुलांसाठी वाटेल ते सोसण्यास तयार आहे. म्हणूनच कवी रत्नाकर म्हणतात की, आम्ही खऱ्या अर्थाने आईत बाप बघण्याचा वारसा पाहिलेला आहे.

'चौंडक' ही या संग्रहातील एक वेगळा आशय सांगणारी गझल आहे. कर्नाटकातील यल्लमा देवीच्या यात्रेतली वास्तवता कवी या कवितेत सांगतो.

"डोक्यावरच्या जगात भलमोठ 'जग' उभं

रेणुकाच्या जत्रतलं पोटात बी कचत आहे"[५३] (चौंडक)

डोक्यावर रेणुकाचा टाक असणारा जग घ्यावा, आणि यात्रेजत्रेतला भोग एवढेच जग या माणसांना माहितअसते.

पारंपरिक अंधश्रद्धेत अडकलेली ही माणसे पुन्हा अंधश्रद्धेच्याच खोल गर्तेत जात आहेत. हेभयाण वास्तव कवीने शब्दबद्ध केलेले आहे.

'साकी' ही अशीच वेगळ्या स्वरूपाची गझल आहे. या 'रुटीनं' जगण्याचा जेव्हा कंटाळा येतो तेव्हा माणूस मदिरा मदिराक्षी यांचा आधार घेतो आणि क्षणभर विरंगुळा तोही खोटा असलेला मिळवितो याचे चित्रण यात येते.

'अलंकार' मध्ये शब्दांचे मोठेपण कवीने सांगितले आहे. कवी म्हणतो हे शब्द मला भेटले नसते तर, माझ्या जगण्यातला अंध:कार उजळला नसता. म्हणून शब्दांचे फार आभार मानायला हवेत. फार प्राचीन काळापासून अनेकांनी शब्दाचे सामर्थ्य वर्णीलेले आहे. कवी रत्नाकर म्हणतात, शब्द हीच माझी धार आणि तलवार आहे. त्यांच्यामुळेच मी बोलू शकलो, लिहू शकलो.

"शब्दांनी शब्द दिले

शब्द माझे शिल्पकार"[५४] - (अलंकार)

कवी शब्दांचे उपकार मानतो. जर मला शब्दच मिळाले नसते तर, मी हा मी झालोच नसतो. मला माझे स्वत्व गवसले नसते. म्हणून या शब्दांच्या दीपांमुळेच माझे जीवन प्रकाशमान झालेले आहे.

"शब्दांनी दीप दिला

उजळला अंध:कार"[५५] - (अलंकार)

संत तुकारामानीही शब्दाचे सामर्थ्य व्यक्त केलेले आहे. त्यांना जसे शब्द आपले शस्त्र वाटते तसे ते कवी रत्नाकरांनाही वाटते.

'माझा देश' या गझलेत कवी म्हणतो मी कोणता देश माझा म्हणू. ज्या देशात आजही जातियता पाळली जाते, ज्या देशांत धर्माला महत्त्व दिले जाते, ज्या देशात दगडांच्या देवपणाला किंमत दिली जाते. तो देश मी माझा कसा म्हणावा. असा प्रश्न कवी रत्नाकरांनी उपस्थित केलेला आहे.

"धर्माचे यज्ञ पुन्हा नव्याने पेटले

धर्म की निधर्माचा माझा देश म्हणू ?"[५६] - (माझा देश)

तथागत गौतमबुद्धाच्या अहिंसेचा वारसा मिळालेल्या या देशात आजही बंदूकीशिवाय कोणतेही कार्य पार पडत नाही. ज्या देशात आजही अनेक निरपराध बळी पडताहेत. ज्ञातिभेदाच्या धगीने माणूस आजही होरपळला जातोय. त्या देशाला माझा देश तरी कसे म्हणावे ?

"जातीभेद युद्धाने माणूस जाळला

युद्धाचा की बुद्धाचा माझा देश म्हणू ?"[५७] - (माझा देश)

कवी नामदेव ढसाळ 'गोलपीठा' या संग्रहात स्वातंत्र्याला १५ ऑगस्ट एक संशयास्पद महाकाय भगोष्ट असे म्हणतात. कारण जे स्वातंत्र्य या देशाला मिळाले. तेच जर माझ्यासाठी नसेल तर, त्या स्वतंत्र देशात आम्ही स्वतंत्र कसे असू ? हा प्रश्न कवीने वाचकांच्यासमोर ठेवलेला आहे.

या गझल संग्रहात कवी रत्नाकरांनी काही 'रूबया' ही लिहिलेल्या आहेत. या रूबयांत त्यांनी सलगपणे मनाच्या तुटलेपणाची जाणीव व्यक्त केलेली आहे.

एकूणच या गझल संग्रहात विविध विषय घेऊन आलेल्या गझला समाविष्ट केलेल्या आहेत. त्या मनातल्या वादळाचे शब्दरूप आहेत. कवी रत्नाकरांनी जे पाहिले, जे अनुभवले त्या अनुभवानांच त्यांनी शब्दरूप दिलेले आहे. स्वत: दलित असून दलित चळवळीवर बोलत असताना त्यांनी कोणताही संकोच बाळगलेला नाही. चळवळीतल्या नेत्यांच्यावर त्यानी परखड टीका केलेली आहे, तसेच समाजातील ढोंगीपणावरही ते हल्ला करतात. इथली व्यवस्था मोडीत काढण्यासाठी त्यांनी कविता

हे शस्त्र वापरलेले आहे. एकूणच काय तर या संग्रहात येणारी गझल ही मिश्र स्वरूपातील आहे. रूबया हा प्रकार देखील कवी रत्नाकरांनी हाताळलेला आहे.

या संग्रहाच्या दीर्घ चर्चेवरून काही निष्कर्ष निघतात ते खालीलप्रमाणे सांगता येतील.

**निष्कर्ष :**

१) या संग्रहाचे मुखपृष्ट संग्रहांच्या नावाचा अर्थबोध करणारे असेच आहे. हजारो वर्षे फाटकी असणारी माणसे, फाटक्या, तुटक्या लक्तरांत राहाणाऱ्या समाजाचे वास्तव त्यातून निर्देशित होते.

२) या संग्रहात येणारी गझल ही मिश्र स्वरूपात येते.

३) डॉ. गौतमबुद्ध बाबासाहेब, यांचा आदर व्यक्त करणारी गझलही या संग्रहात येते.

४) या देशातील राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व्यवस्थेवर ही गझल ताशेरे ओढते.

५) या संग्रहात दलित चळवळ तिचे झालेले विघटन, नेत्यांचा नाकर्तेपणा यावर कवी रत्नाकर मुक्तपणे बोलतात.

६) कवीने स्वत: अनुभवलेल्या घटनांचे चढउतार ह्या संग्रहातील गझलांतून येतात.

७) गझल ही प्रामुख्याने शृंगार भावना व्यक्त करण्यासाठी लिहिली जाते. मात्र या संग्रहात येणारी गझल ही सामाजिक विषय घेऊन येते.

८) कवी रत्नाकरांच्या चिंतनातून व्यवस्थेमध्ये जे अन्यायकारी आहे तेच या गझलेतून प्रकट झालेले आहे.

**समारोप :**

माणसाला केंद्रीभूत मानणारी रत्नाकरांची ही गझल माणसावर होणाऱ्या अन्यायावर बोलते. या संग्रहातील सर्वच गझला या वेगवेगळा विषय घेऊन आलेल्या आहेत. मुळात कवी रत्नाकर हे फुले-आंबेडकरी विचारांचे पुरस्कर्ते असल्याने त्यांचा दृष्टिकोण हा मानवतावादी राहिलेला आहे. कवीची अन्यायाविरोधी बोलणारी भाषा जरी संयमाने येत असली तरी तिला फुले-आंबेडकरी विचारांचा भक्कम पाया लाभलेला आहे. म्हणूनच तर ती कुठेच उरबडवेपणा करताना दिसत नाही. गझल हा प्रकार

शृंगारकाव्य म्हणून प्रचलित असला तरी त्यातून सामाजिक आशयही सांगता येतो. हे रत्नाकरांच्या गझलाचा अभ्यास केल्यानंतर ध्यानात येते. गझल हा प्रकार जरी मराठीत मोठ्या प्रमाणावर दिसत नसला तरी, कवी रत्नाकरांनी तो समर्थपणे हाताळलेला आहे.

अन्यायाला अन्याय म्हणून त्याच्या नाशासाठी ही गझल शस्त्र बनते. हे या गझल संग्रहाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

------

## संदर्भ


१) हाली अल्ताफ हुसेन (मु.ले.) : अनु. श्री.रं. कुलकर्णी, साहित्य अकादेमी, नवी दिल्ली, प्र.आ. १९७१, पृ.क्र. ९७.

२) रत्नाकर धम्मपाल : लक्तराची गझल, निहारा प्रकाशन, पुणे, 'चिवली', (गझल), प्र.आ.१९९४, पृ.क्र.१७.

३) रत्नाकर धम्मपाल : उनि. 'किनारा', (गझल), पृ.क्र.१९.

४) रत्नाकर धम्मपाल : उनि. 'किनारा', (गझल), पृ.क्र.१९.

५) रत्नाकर धम्मपाल : उनि. 'अपराध', (गझल), पृ.क्र.९.

६) रत्नाकर धम्मपाल : उनि. 'लाजणे', (गझल), पृ.क्र.६.

७) रत्नाकर धम्मपाल : उनि. 'उदास', (गझल), पृ.क्र.११.

८) रत्नाकर धम्मपाल : उनि. 'उदास', (गझल), पृ.क्र.११.

९) रत्नाकर धम्मपाल : उनि. 'चांदणी', (गझल), पृ.क्र.२०.

१०) रत्नाकर धम्मपाल : उनि. 'विश्वास', (गझल), पृ.क्र.२२.

११) रत्नाकर धम्मपाल : उनि. 'विश्वास', (गझल), पृ.क्र.२२.

१२) रत्नाकर धम्मपाल : उनि. 'गजरा', (गझल), पृ.क्र.२३.

१३) रत्नाकर धम्मपाल : उनि. 'चूक', (गझल), पृ.क्र.२७.

१४) रत्नाकर धम्मपाल : उनि. 'उदावरून', (गझल), पृ.क्र.३०.

१५) रत्नाकर धम्मपाल : उनि. 'निमंत्रणे', (गझल), पृ.क्र.३३.

१६) रत्नाकर धम्मपाल : उनि. 'वादळ', (गझल), पृ.क्र.३४.

१७) रत्नाकर धम्मपाल : उनि. 'माणूस', (गझल), पृ.क्र.५.

१८) रत्नाकर धम्मपाल : उनि. 'रस्ता', (गझल), पृ.क्र.५.

१९) रत्नाकर धम्मपाल : उनि. 'नोंद', (गझल), पृ.क्र.६.

२०) रत्नाकर धम्मपाल : उनि. 'प्रश्न', (गझल), पृ.क्र.७.

२१) रत्नाकर धम्मपाल : उनि. 'स्वभाव', (गझल), पृ.क्र.१३.

२२) रत्नाकर धम्मपाल : उनि. 'खेळ', (गझल), पृ.क्र.१९.

२३) रत्नाकर धम्मपाल : उनि. 'एकांतवासी', (गझल), पृ.क्र.२३.

२४) रत्नाकर धम्मपाल : उनि. 'कवडसा', (गझल), पृ.क्र.२४.

२५) रत्नाकर धम्मपाल : उनि. 'वाटोळे', (गझल), पृ.क्र.२६.

२६) रत्नाकर धम्मपाल : उनि. 'उपाय', (गझल), पृ.क्र.२७.

२७) रत्नाकर धम्मपाल : उनि. 'प्रवासी', (गझल), पृ.क्र.२८.

२८) रत्नाकर धम्मपाल : उनि. 'खूप खोटे', (गझल), पृ.क्र.३१.
२९) रत्नाकर धम्मपाल : उनि. 'आयुष्या', (गझल), पृ.क्र.७.
३०) रत्नाकर धम्मपाल : उनि. 'भाग्यवान', (गझल), पृ.क्र.१२.
३१) रत्नाकर धम्मपाल : उनि. 'लक्तरांची गझल', (गझल), पृ.क्र.२१.
३२) रत्नाकर धम्मपाल : उनि., 'लक्तरांची गझल', (गझल), पृ.क्र.२१.
३३) रत्नाकर धम्मपाल : उनि., 'कंगाल', (गझल), पृ.क्र.३०.
३४) रत्नाकर धम्मपाल : उनि., 'अनोळखी', (गझल), पृ.क्र.३३.
३५) रत्नाकर धम्मपाल : उनि.. 'सूर्य', (गझल), पृ.क्र.८.
३६) रत्नाकर धम्मपाल : उनि.. 'हाक', (गझल), पृ.क्र.११.
३७) रत्नाकर धम्मपाल : उनि.. 'गर्दीत', (गझल), पृ.क्र.१६.
३८) रत्नाकर धम्मपाल : उनि., 'दिवे', (गझल), पृ.क्र.२२.
३९) रत्नाकर धम्मपाल : उनि., 'बंद करा', (गझल), पृ.क्र.२५.
४०) रत्नाकर धम्मपाल : उनि.,'लक्तरांची गझल',(गझल),प्रस्तावना,पृ.क्र.७.
४१) रत्नाकर धम्मपाल : उनि., 'आंदोलन', (गझल), पृ.क्र.१४.
४२) रत्नाकर धम्मपाल : उनि., 'धमकी', (गझल), पृ.क्र.१५.
४३) रत्नाकर धम्मपाल : उनि., 'युती', (गझल), पृ.क्र.१३.
४४) रत्नाकर धम्मपाल : उनि. 'कारागृहात', (गझल), पृ.क्र.१५.
४५) रत्नाकर धम्मपाल : उनि., 'मा.मु. (?)', (गझल), पृ.क्र.२५.
४६) रत्नाकर धम्मपाल : उनि., 'नामांतर', (गझल), पृ.क्र.२६.
४७) रत्नाकर धम्मपाल : उनि., 'गौतमा', (गझल), पृ.क्र.३५.
४८) रत्नाकर धम्मपाल : उनि., 'चंद्र', (गझल), पृ.क्र.३२.
४९) रत्नाकर धम्मपाल : उनि., 'वाटणी', (गझल), पृ.क्र.२०.
५०) रत्नाकर धम्मपाल : उनि., 'टाळतात मला', (गझल), पृ.क्र.२४.
५१) रत्नाकर धम्मपाल : उनि., 'चेहरे', (गझल), पृ.क्र.२९.
५२) रत्नाकर धम्मपाल : उनि., 'वारसा', (गझल), पृ.क्र.९.
५३) रत्नाकर धम्मपाल : उनि., 'चौंडक', (गझल), पृ.क्र.१४.
५४) रत्नाकर धम्मपाल : उनि., 'अलंकार', (गझल), पृ.क्र.१८.
५५) रत्नाकर धम्मपाल : उनि., 'अलंकार', (गझल), पृ.क्र.१८.
५६) रत्नाकर धम्मपाल : उनि., 'माझा देश', (गझल), पृ.क्र.३४.
५७) रत्नाकर धम्मपाल : उनि., 'माझा देश', (गझल), पृ.क्र.३४.